MHKO100011382020

**नियमित दिवाणी दावा क्र. ९४/२०२० मधील निशाणी क्र. ८१ वरील आदेश**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.१ श्री.संभाजी केरबा देसाई हे दिनांक २३/०७/२०२५ रोजी मयत झाले असलेने त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

२. वि.प. यांनी त्याच अर्जावर दिलेले म्हणणे वाचले. त्याचे असे म्हणणे आहे की, अर्जातील कारणे चुकीची आहेत. वादी व प्रतिवादी क्र.१ हे एकाच गावचे रहिवाशी असून ते एकमेकांजवळ राहणेस होते. त्यामुळे त्यांची मयत झालेची कल्पना नव्हती हे विधान पटणारे नाही. सबब, अर्ज मंजूर करणेचा झालेस वादीवर जास्तीत जास्त खर्च बसविण्याची विनंती केली.

३. वादी यांनी प्रतिवादी क्र.१ श्री.संभाजी केरबा देसाई यांच्या वारसांची नावे अर्जात नमुद केली आहेत. ती चुकीची आहेत असे वि.प. यांचे कथन नाही. सदर अर्ज गुणदोषावर निकाली काढणेसाठी प्रतिवादी क्र.१ श्री.संभाजी केरबा देसाई यांचे वारस याकामी समाविष्ठ करणे न्यायाचे आहे. त्याकरीता सदर अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी अर्जात १४ दिवसांचे आत दुरुस्ती करावी व अर्जाची दुरुस्ती प्रत दाखल करुन पुढील पुर्तता सत्वर करावी.

३. अर्जाचा खर्च मुळ अर्जात समाविष्ठ करणेत येत आहे.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2026.05.05 18:09:43 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०५/०५/२०२६

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज